**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी**
**शिक्षण मंडळ**
**मानधन तत्वावर ६ महिने मुदतीसाठी करार पध्दतीने उपशिक्षक / पदवीधर शिक्षक नेमणूक करणे बाबत.**

जाहिरात क्रं ०१/२०१६ दि १८/८/२०१६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी करारपध्दतीने मनपा प्राथमिक शाळेसाठी मराठी, उर्दू, हिंदी व इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांची करारपध्दतीने मानधन तत्वावर आवश्यकता आहे. त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**१) मराठी माध्यम पद- उपशिक्षक**
**आवश्यक पदे : ७५ शैक्षणिक अर्हता : एच.एस.सी. डी.एड.**

| अनु.जाती | अनु.जमाती | विजा | भज(ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | -- | --- | --- | -- | -- | -- | ११ | ५२ |

**२) मराठी माध्यम पद- पदवीधर शिक्षक**
**आवश्यक पदे : ६६ शैक्षणिक अर्हता : बी.एस्सी. बी.एड.**

| अनु.जाती | अनु.जमाती | विजा | भज(ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | ३ | ६ | १ | ७ | ५ | २ | १ | २४ |

**३) उर्दू माध्यम पद- उपशिक्षक**
आवश्यक पदे : **१३** शैक्षणिक अर्हता : एच.एस.सी. डी.एड

**४) उर्दू माध्यम पद- पदवीधर शिक्षक**
आवश्यक पदे : **२०** शैक्षणिक अर्हता : १) बी.एस्सी बी.एड - **१३ पदे**
२) बी.ए.,बी.एड (समाजशास्त्र) **०७ पदे**

**५) हिंदी माध्यम पद- उपशिक्षक**
आवश्यक पदे : **१४** शैक्षणिक अर्हता : एच.एस.सी. डी.एड

**६) हिंदी माध्यम पद- पदवीधर शिक्षक**
आवश्यक पदे : **३** शैक्षणिक अर्हता : बी.एस्सी. बी.एड

**७) इंग्रजी माध्यम पद- उपशिक्षक**
आवश्यक पदे : **८** शैक्षणिक अर्हता : एच.एस.सी. डी.एड

| अनु.जाती | अनु.जमाती | विजा अ | भज(ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | --- | १ | -- | -- | -- | -- | १ | ३ |

**८) इंग्रजी माध्यम पद- पदवीधर शिक्षक**
**आवश्यक पदे :८** शैक्षणिक अर्हता : १) बी.एस्सी बी.एड - २ पदे
२) बी.ए.,बी.एड (समाजशास्त्र) ३ पदे
३) बी.ए.बी.एड (भाषा) ३ पदे

| अनु.जाती | अनु.जमाती | विजा अ | भज(ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | ४ |

**अटी / शर्ती :-**

१) करारपध्दतीने नेमलेल्या शिक्षकांची नेमणूक ही ६ महिने मुदतीची असेल, त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क प्राप्त राहणार नाही अथवा या संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) अर्जदार TET परिक्षा पात्र असावा. आवश्यक संख्येइतके अर्ज TET पात्रताधारक उमेदवारांतून प्राप्त न झाल्यास इतर प्राप्त अर्जातून डी.एड पदवीका व बी. एड पदवीच्या प्राप्त गुणाच्या आधारे गुणानुक्रमे पुढील उमेदवारास नेमणूक देण्यात येईल.

३) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यवसायिक अर्हताविषयक प्रमाणपत्र, डी.एड. पदवीका बी.एड पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक, जातीचा दाखला व अनुभव (असल्यास) इत्यादी कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

४) ज्या दिवशी शिक्षण मंडळास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल यासंबंधीचे सर्व अधिकार शिक्षण मंडळ राखून ठेवत आहे.

५) पात्र उमेदवारांना नेमणूक देताना पदसंख्या कमी-जास्त करण्याचा अधिकार शिक्षण मंडळास राहील.

६) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यात पदासाठी अर्ज मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ या नावाने करावा. सदरचा अर्ज दि २९/०८/२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील पत्यावर रजिस्टर पोस्टाने पोहोचतील अशा बेताने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावेत.

७) निवड झालेल्या उमेदवारास रक्कम रुपये ६,०००/- (अक्षरी सहा हजार फक्त) या मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

८) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्ज / पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अथवा निवड रद्दबातल तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९) ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव पाकीटावर ठळक अक्षरात लिहावे.

१०) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही.

११) पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, अपुर्ण कागदपत्रे जोडलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

१२) उमेदवार निवडीसाठी कोणताही दबाव आणल्यास सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३) अर्जदाराने आपले अर्ज महानगरपालिकेने जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१४) अपूर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज बाद करुन अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करण्यात येतील. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

१५) सदरचे पद हे पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाचे आहे. या पदावर उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद आवश्यकतेनुसार फक्त सहा महिने मुदतीचे राहील.

१६) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास १००/- रुपये स्टॅम्प पेपरवर मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही तसेच मा. न्यायालयात दाद मागणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय शिक्षण मंडळाचा राहील.

सही/-
प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी१८

सही/-
सभापती
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी१८

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा. प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी , पुणे १८

पासपोर्ट साईज
फोटो

विषय : उपशिक्षक / पदवीधर शिक्षक पदी एकवट पध्दतीने मानधनावर नेमणूकी बाबत.

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी ------------------------------या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| | | आडनाव | स्वतःचे नाव | वडील/पतीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नांव | ---------------------------------------------------------- | | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) | ----------------------------------------------------------<br>---------------------------------------------------------- | | |
| ३ | दुरध्वनी/मोबाईल क्र. | ---------------------------------------------------------- | | |
| ३ | जन्मतारीख | दि / / | (अक्षरी------------------------------) | |
| ४ | लिंग | स्त्री / पुरुष | | |
| ५ | जात | ---------------------------------------------------------- | | |
| ६ | जात वैधता प्रमाणपत्र क्रंमांक | ______________________________________ | | |
| ७ | अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | | |

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | |
| २ | एच.एस.सी. | | | |
| ३ | बी.ए. / बी.एस्सी | | | |
| ४ | पदव्युत्तर पदवी | | | |
| ५ | डी.एड. | | | |
| ६ | बी.एड (माध्यम / विषय) | | | |
| ७ | एम.एड. | | | |

८ अनुभव (असल्यास) ----------------------------------------------------------

९ TET उत्तीर्ण आहे / नाही वर्ष ------------ प्राप्त गुण----------

वर नमुद केलेली तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन. तसेच माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची सही व नाव

सहपत्रे :
१)
२)